# संचालनालयाकडून पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येणारे प्रशिक्षण

- ❖ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना गुन्हे घटनास्थळावरील रासायनिक विश्लेषणाच्या अनुषंगाने भौतिक पुरावे गोळा करण्याचे प्रशिक्षण:- न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय तसेच अधिपत्याखालील कार्यरत सर्व प्रादेशिक व लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांमार्फत प्रशिक्षण देण्यात येते.
- ❖ न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण विभागामध्ये मुद्देमाल तसेच संबंधित मुद्देमाल अग्रेषित करणे, शास्त्रीय पद्धतीने व्हॉईस सॅम्पल कलेक्शन नमुना घेणे, डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर कसे वापरणे तसेच डिजिटल मिडीया/Document यांचे हॅश व्हॅल्यू काढण्याबाबतचे प्रशिक्षण:- न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय तसेच अधिपत्याखालील प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांतील संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण विभागामार्फत प्रशिक्षण देण्यात येते.
- ❖ महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा करीता प्रयोगशाळेमार्फत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करणेसाठी अधिकारी यांची नियुक्ती केली जाते.
- ❖ Maharashtra Judicial Academy, Uttan, Thane येथील प्रशिक्षणार्थी न्यायिक अधिकारी यांना सर्व विभागांची मुलभूत माहितीबाबत प्रशिक्षण (१ दिवसीय प्रयोगशाळा भेटीचे आयोजन केले जाते.)
- ❖ महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे आयोजित करण्यात येणाऱ्या पोलीस घटकातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवांतर्गत प्रशिक्षण सत्रात न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संदर्भातील विषयांकरीता तज्ञ व्याख्याते पाठविले जातात.
- ❖ वन्यप्राणी मृत्यू प्रकरणी नमूने गोळा करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येते.